12 DEC 2017 महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'एमओयू 'तून संशोधनाचा पूल

**Anuradha.kadam**
@timesgroup.com
Tweet : @anuradahkadamMT

. **कोल्हापूर :** तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिक कार्यक्षम होत विद्यार्थ्यांना संशोधनासाठी पोषक वातावरण देणारे काही महत्त्वाचे सामंजस्य करार शिवाजी विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय संस्थांशी केले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक फायदा होणार आहे. वर्षभरात झालेल्या करारांमुळे संशोधनाचे पूल जोडले जात आहेत, तर आदानप्रदान या संकल्पनेतून विद्यापीठातील काही विद्यार्थी परदेशातील विद्यापीठांमध्ये अभ्यासासाठी गेले आहेत.

### डिजिटल कराराने एक पाऊल पुढे

सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, मुंबई अर्थात 'सीडीएसएल'सारख्या महत्त्वपूर्ण डिपॉझिटरी कंपनीसमवेत शिवाजी विद्यापीठाच्या सामंजस्य करारामुळे विद्यापीठाची डिजिटल वाटचाल अधिक जोमाने होणार आहे. अशा प्रकारचा सामंजस्य करार करणारे शिवाजी विद्यापीठ देशातील अवघे १७वे विद्यापीठ ठरले आहे. केंद्र सरकारने डिजिटल इंडिया मोहिमेंतर्गत हा करार केला आहे. विद्यार्थ्यांना त्यांची पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रके तसेच अन्य शैक्षणिक प्रमाणपत्रे डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्याचा हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. शंभर टक्के डिजिटलाईज्ड होण्याचा विद्यापीठाचा मानस या करारामुळे पूर्ण होण्याच्या टप्प्यावर आहे. 'डिजिटल इंडिया' उपक्रमांतर्गत देशातील सर्व विद्यार्थ्यांची अंतिम गुणपत्रके, दीक्षान्त प्रमाणपत्रे, आदी माहिती आधार कार्डशी संलग्नित करून राष्ट्रीय डाटाबेसमध्ये ठेवली जाईल. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार ही माहिती त्यांच्या पुढील शिक्षण, नोकरीसाठी व प्रमाणपत्रे तपासणीसाठी डिजिटल माध्यमातून वापरता येऊ शकतील. यामुळे कागदावरील खर्च वाचेलच, शिवाय विद्यार्थ्यांना त्यांची अधिकृत प्रमाणपत्रे जगाच्या पाठीवर कोठूनही मिळविता येऊ शकतील.

**विविध करारांतर्गत विद्यार्थ्यांना फायदा**

### साखर उद्योगाला आली गती

पश्चिम महाराष्ट्रासह देशातील साखर उद्योगासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. त्यांचा उहापोह करून या उद्योगाला दिशा देण्याचे काम भारतीय शुगरसमवेत झालेल्या सामंजस्य कराराच्या माध्यमातून सुरू आहे. पुणे येथील भारतीय शुगर ही संस्था आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या दरम्यान सहकार्यवृद्धीबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. साखर उद्योग सध्या विविध अडचणींतून वाटचाल करीत आहे, हे खरे असले तरी या उद्योगातील व्यवस्थापन आणि गुंतलेल्या अर्थकारणाला योग्य दिशा दिल्यास या उद्योगाचे आणि त्याच्याशी संबंधित शेतकऱ्यांचेही भवितव्य उज्ज्वल आहे. त्यामुळे विद्यापीठ पातळीवर आंतरविद्याशाखीय सहकार्यातून साखर उद्योगात गुंतलेल्या विविध प्रवाहांचा वेध घेण्यात यावा आणि त्यातून या उद्योगास योग्य दिशा मिळावी यादृष्टीने संशोधन सुरू आहे. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून साखर उद्योगाशी संबंधित विविध प्रशिक्षण कार्यशाळा, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे, व्याख्याने, मार्गदर्शन शिबिरे आदींचे नियोजन आले आहे.

### विचारांचे आदानप्रदान

शिवाजी विद्यापीठ आणि इस्त्राईल येथील एरियल विद्यापीठ यांच्यात झालेल्या करारामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना थेट परदेशात संशोधनासाठी जाण्याची संधी मिळाली आहे. एरियल विद्यापीठाशी झालेल्या या सामंजस्य कराराअंतर्गत संशोधन व विकास या गोष्टींवर भर देण्यात आला असून, स्टुडंट एक्स्चेंज, फॅकल्टी एक्स्चेंज, संयुक्त संशोधन प्रकल्प, संयुक्त परिषदा, परिसंवाद व चर्चासत्रांचे आयोजन, परस्परांस उपयुक्त अशी माहिती व ज्ञानाचे आदानप्रदान आदी बाबींचा समावेश आहे. याअंतर्गत विद्यापीठातील चार विद्यार्थी संशोधनासाठी परदेशात गेले आहेत. यामुळे भारत आणि इस्त्राईल या दोन्ही देशांतील शैक्षणिक, संशोधकीय व सांस्कृतिक बंध दृढ होण्यास चालना मिळाली आहे. संशोधनाच्या क्षेत्रात या भागीदारीमुळे भरीव कामगिरी करता येणे शक्य होणार आहे.

### संधींचे दालन खुले


पोर्टसमाऊथ विद्यापीठ, यू.के. आणि वॉलन्गॉन्ग विद्यापीठ, ऑस्ट्रेलिया (दुबई कॅम्पस) या विद्यापीठांशी शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला आहे. विज्ञानाबरोबरच सामाजिक विज्ञान, भाषा आदी विद्याशाखांमधील संशोधनासाठीची अनेक सामायिक क्षेत्रे सामोरी आली. या विषयांवर पोर्टसमाऊथ विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ विविध आघाड्यांवर एकत्रित काम सुरू आहे. यामुळे संयुक्त संशोधनाच्या अनेक शक्यता व संधी त्यातून पुढे येणार आहेत. हा करार ऑस्ट्रेलियन वॉलन्गॉन्ग विद्यापीठाच्या केवळ दुबई कॅम्पसपुरता मर्यादित नसून या विद्यापीठाशी संलग्नित सर्व कॅम्पसशी संबंधित आहे. त्यामुळे संशोधन व शैक्षणिक सहकार्याच्या अमर्याद संधी दोन्ही विद्यापीठांसाठी याद्वारे खुल्या झाल्या आहेत.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स

# १४ पासून संविधान विश्लेषण व्याख्यानमाला

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**



प्रा. डॉ. मार्क डेव्हीड ब्राऊन

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या 'ग्यान' उपक्रमांतर्गत अमेरकेतील ज्येष्ठ विधिज्ञ प्रा. डॉ. मार्क डेव्हीड ब्राऊन यांची येत्या १४ ते २० डिसेंबर २०१७ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्याने होणार आहेत. अमेरिका व भारतीय संविधानाचे तुलनात्मक विश्लेषण प्रा. ब्राऊन आपल्या व्याख्यानांद्वारे करतील.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय पुरस्कृत 'ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ ॲकॅडेमिक नेटवर्क' (ग्यान) या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या विधि अधिविभागातर्फे १४ डिसेंबरपासून अमेरिकेतील वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीच्या प्रा.डॉ. मार्क डेव्हीड ब्राऊन यांची व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. 'अन्डरस्टँडिंग द अलॉकेशन ऑफ पॉवर अन्डर द युनायटेड स्टेट्स ॲन्ड इंडियन



कॉन्स्टिट्यूशन: अ कम्पॅरेटिव्ह ॲनालिसिस' या विषयावर ते व्याख्याने देतील.

भारतीय आणि अमेरिकन संविधानाच्या विविध पैलूंवर या उपक्रमाअंतर्गत चर्चा होणार आहे.

कोल्हापूर न्यायालयाचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. ए. लव्हेकर यांच्या हस्ते येत्या गुरुवारी (ता. १४) सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या व्हर्चुअल क्लासरुममध्ये या व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार आहे. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती विद्यापीठाच्या 'ग्यान'उपक्रमाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत आणि अभ्यासक्रम समन्वयक डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठात १४ पासून 'ग्यान' उपक्रम

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या 'ग्यान' उपक्रमांतर्गत अमेरिकेतील ज्येष्ठ विधिज्ञ प्रा. मार्क डेव्हिड ब्राऊन यांचे दि. १४ ते २० डिसेंबर या कालावधीत शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान होणार आहे.


मार्क डेव्हिड ब्राऊन

अमेरिका आणि भारतीय संविधानाचे तुलनात्मक विश्लेषण प्रा. ब्राऊन करणार आहेत. वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीचे प्रा. ब्राऊन 'अन्डरस्टॅंडिंग द अलॉकेशन ऑफ पॉवर अन्डर द युनायटेड स्टेट्स अॅन्ड इंडियन कॉन्स्टिट्यूशन : अ कम्पॅरॅटिव्ह अॅनालिसिस' या विषयावर व्याख्याने देतील. कोल्हापूर न्यायालयाचे प्रधान जिल्हा व

▶▶ पान २ वर

# विद्यापीठात १४ पासून 'ग्यान' उपक्रम

(पान १ वरून) सत्र न्यायाधीश एम. ए. लव्हेकर यांच्या हस्ते गुरुवारी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या व्हर्चुअल क्लासरूममध्ये व्याख्यानमालेचे उद्‌घाटन होईल. गतवर्षीही ग्यान उपक्रमातंर्गत जगविख्यात अनेक प्राध्यापकांनी शिवाजी विद्यापीठात येऊन विविध विषयावर मार्गदर्शन केले होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती उपक्रमाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत, डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2017
लोकसत्ता

# डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन यांची व्याख्याने

**कोल्हापूर :** केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या उपक्रमांतर्गत अमेरिकेतील ज्येष्ठ विधिज्ञ प्रा. डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन यांची येत्या १४ ते २० डिसेंबर या कालावधीत शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्याने होणार आहेत. अमेरिका व भारतीय संविधानाचे तुलनात्मक विश्लेषण प्रा. ब्राऊन आपल्या व्याख्यानांद्वारे करणार आहेत. 'ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ अॅकॅडेमिक नेटवर्क' (ग्यान) या उपक्रमांतर्गत विधी अधिविभागातर्फे १४ डिसेंबरपासून अमेरिकेतील वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीच्या प्रा. डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन यांची व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. कोल्हापूर न्यायालयाचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. ए. लव्हेकर यांच्या हस्ते येत्या गुरुवारी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयामध्ये या व्याख्यानमालेचे उद्घाटन होईल, अशी माहिती विद्यापीठाच्या या उपक्रमाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत आणि अभ्यासक्रम समन्वयक डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांनी सोमवारी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2017
पुढारी

# विद्यापीठात गुरुवारपासून 'ग्यान' उपक्रमांतर्गत व्याख्याने

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या ग्यान उपक्रमांतर्गत अमेरिकेतील वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीच्या प्रा. डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन यांची दि. १४ ते २० डिसेंबर २०१७ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्याने होणार आहेत. अमेरिका व भारतीय संविधानाचे तुलनात्मक विश्लेषण प्रा. ब्राऊन आपल्या व्याख्यानांद्वारे करतील.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय पुरस्कृत ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ ॲकॅडेमिक नेटवर्क (ग्यान) या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागातर्फे ही व्याख्यानमाला होईल. कोल्हापूर न्यायालयाचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. ए. लव्हेकर यांच्या हस्ते गुरुवारी (दि.१४) सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या व्हर्च्युअल क्लासरूममध्ये या व्याख्यानमालेचे उद्घाटन होईल. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. ग्यान उपक्रमाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत आणि अभ्यासक्रम समन्वयक डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांनी याबाबत माहिती दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स

# नवीन तुकड्यांना विद्यापीठाची मान्यता

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि क्रॉप सायन्स या अभ्यासक्रमांच्या १३ नवीन तुकड्या सुरू करण्यास कायमस्वरूपी विनाअनुदान तत्त्वावर राज्य सरकारने मान्यता दिली आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ११ महाविद्यालयांचा समावेश आहे. सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागातर्फे हा आदेश देण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत तांत्रिक, वाणिज्य, कृषी, मत्स्य गटातील एकूण १६ व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यात येतात. या अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदविकेच्या द्वितीय वर्षामध्ये प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. या अभ्यासक्रमांची वाढती मागणी लक्षात घेऊन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या अधिकच्या किंवा नवीन तुकड्या कायमस्वरूपी विना अनुदानित तत्त्वावर सुरू करण्यास इच्छुक असलेल्या संस्थांकडून प्राप्त झालेल्या अर्ज, प्रस्तावांची व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने छाननी केली. निकष, मानकांची पूर्तता करणारे प्रस्ताव हे बारावीच्या स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांच्या नवीन अथवा अधिकच्या तुकड्यांमध्ये कायमस्वरूपी विनाअनुदान तत्त्वावर सन २०१७-१८ पासून सुरू करण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सरकारला सादर करण्यात आला.

### नवीन तुकड्या

- कॉम्प्युटर सायन्स : ६
- क्रॉप सायन्स : ३
- इलेक्ट्रॉनिक्स : ४

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2017
सकाळ



**कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय सायकल स्पर्धेसाठी राजस्थानला रवाना झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या संघातील खेळाडू समवेत क्रीडा शिक्षक पी. टी. गायकवाड आदी.**

# सायकल स्पर्धेसाठी संघ निवड

कोल्हापूर, ता. ११ : आंतरविद्यापीठ राष्ट्रीय सायकल स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या संघात कोल्हापूरचे अनिकेत सुतार, विजय पाटील, नजिम मुजावर, अक्षय कारेकरसह सांगलीचा अक्षयकुमार पाटील, साताऱ्याचा सुशांत गुरव या सहा खेळाडूंची निवड झाली. बिकानेर (राजस्थान) येथे होणाऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ सायकलिंग रोडरेस स्पर्धेसाठी हा संघ रवाना झाला. हा संघ कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांत घेण्यात आलेल्या आंतरविभागीय स्पर्धेतून निवडण्यात आला. संघाला विद्यापीठाचे क्रीडा शिक्षक पी. टी. गायकवाड यांनी शुभेच्छा दिल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2017
पुढारी

# विद्यापीठ आंतरविभागीय ज्युदो चॅम्पियनशिप स्पर्धा उद्यापासून

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यापीठ आंतरविभागीय ज्युदो स्पर्धा १३ व १४ डिसेंबर या कालावधीत होणार आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या जिम्नॅस्टिक सभागृहात या स्पर्धा होणार आहेत. यापूर्वी या स्पर्धा १५ व १६ डिसेंबर या कालावधीत एस. बी. खाडे महाविद्यालय, कोपर्डे येथे नियोजित होत्या.

दोन दिवस अगोदर या स्पर्धा होणार असल्याने बदललेले वेळापत्रकानुसार स्पर्धकांनी व संबंधित क्रीडा शिक्षकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाचे क्रीडा विभागप्रमुख प्रा. पी. टी. गायकवाड यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2017
तरुण भारत

# विद्यापीठ आंतरविभागीय ज्युदो स्पर्धा १३ डिसेंबरपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय मुलांची ज्युदो स्पर्धा १५ ते १६ डिसेंबर या दरम्यान होणार होती. मात्र काही तांत्रिक अडचणींमुळे या स्पर्धेचे आयोजन १३ व १४ डिसेंबर दरम्यान केले जाणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या जिमनॅशीयम हॉलमध्ये ही स्पर्धा होतील. सकाळी ८ ते सायंकाळी ५ अशी स्पर्धेची वेळ असणार आहे. तरी स्पर्धेत सहभाग घेतलेल्या आणि भाग घेऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाचे क्रीडा विभागप्रमुख पी. टी. गायकवाड यांनी केले आहे.